SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX–2609000, AffiliationT1 Section–0231-2609089, 2609146
Web : www.unishivaji.ac.in Email: affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - इपीबीएक्स - २०६०९०००, संलग्नता टी.१ विभाग : ०२३१- २६०९०८९, २६०९१४६
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ईमेल : affiliationt1@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

जा.क्र.आय/टे.३/चेंजिस-इन-स्टाफ/ 1880 दिनांक: 17 JAN 2024

# परिपत्रक

प्रति,

मा.संस्था अध्यक्ष/प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय : 'चेंजिस - इन - स्टाफ' फॉर्म विलंब दंडाबाबत..

संदर्भ : या कार्यालयाची पत्रे जा.क्र. -

१. आय/टे.३/३१५, दि.२२/०७/१९९६
२. आय/टे.५/व्ही/१७६/१९०, दि.०४/०७/१९९८
३. आय/टे.३/४६९/४७६, दि.२०/११/१९९९
४. आय/टे.३/चेंजिस इन स्टाफ/१७, दि.१७/०४/२००१
५. आय/टे.३/चेंजिस इन स्टाफ/५०८०, दि.१४/०९/२००४
६. आय/टे.३/चेंजिस इन स्टाफ/१०७७/६८४, दि.०४/१०/२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांनी सर्व चेंजिस-इन- स्टाफ मान्यता या एका वर्षाच्या आत घेणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकांनी विहीत कालावधीमध्ये चेंजिस-इन- स्टाफ फॉर्म भरून आवश्यक शुल्काची पावती सोबत जोडून प्राचार्यांमार्फत सादर करणे आवश्यक आहे. चेंजिस-इन- स्टाफ फॉर्म विहीत कालावधीमध्ये शिक्षकांनी सादर न केल्यास नियमानुसार रू.५००/- प्रतीवर्षी दंड आकारण्यात येईल. सदर विलंब दंड रक्कमेची जबाबदारी ही संबधीत शिक्षकाची राहील.

तसेच संबधीत शिक्षकांनी विहीत कालावधीमध्ये चेंजिस-इन-स्टाफ फॉर्म विहीत शुल्कासह महाविद्यालयाकडे सादर केल्यानंतर प्राचार्यांनी सदर फॉर्म विहीत कालावधीमध्ये विद्यापीठाकडे न पाठविल्यास विलंबाबत विद्यापीठाकडून नियमानुसार आकारल्या जाणाऱ्या विलंब दंड रक्कमेची जबाबदारी ही संबधित प्राचार्यांची राहील. तरी कृपया सदरचे परिपत्रक महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणावे. सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता टी-१ विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

D:\Changes in staff /sub /721